# मुंबई पोस्टल एम्प्लॉईज को-ऑप. क्रेडिट सोसायटी लिमिटेड

## Mumbai Postal Employees Co-operative Credit Society Ltd.

दूरध्वनी क्र. : २२६२ ०४१३, २२६१ ४१७२, ८०९७८६१५०१, ८०९७८६३५०१
Whatsapp No. : 9769928894 • Email : mumbaipostsociety@gmail.com

जी. पी. ओ. बिल्डींग, तळ मजला, मुंबई - ४०० ००१. / G. P. O. Building, Ground Floor, Mumbai - 400 001.


**कृपया सदर पत्रक सभासदांच्या माहितीकरीता कार्यालयाच्या सूचना फलकावर लावावे**

सभासद बंधू-भगिनींनो

आपणांस कळविण्यात येते सन १९९४-९५ या शैक्षणिक वर्षापासून शालेय विविध परीक्षांमध्ये प्राविण्य मिळविणारे सभासद तसेच त्यांचा पति/पत्नीस/पाल्यांना सोसायटीच्या वतीने पारितोषिक देण्यास सुरुवात केली आहे.

१) सन २०२५–२०२६ या शैक्षणिक वर्षासाठी खालील अटी पूर्ण करणाऱ्या सभासदांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत

अ) माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (१०वी) च्या परीक्षेत किमान ७०% अथवा त्यापेक्षा जास्त गुण मिळालेले विद्यार्थी असावेत.

ब) उच्च माध्यमिक (१२वी) च्या परीक्षेत किमान ६०% अथवा त्यापेक्षा अधिक गुण मिळाले असावेत.

क) पदवी (सर्व शाखा) परिक्षेत किमान ६०% अथवा त्यापेक्षा अधिक गुण मिळाले असावेत.

ड) पदव्युत्तर (सर्व शाखा) परीक्षेत किमान ६०% अथवा त्यापेक्षा अधिक गुण मिळाले असावेत.

इ) डिप्लोमा कोर्सेस किमान ६०% अथवा त्यापेक्षा अधिक गुण मिळाले असावेत.

फ) डिग्री कोर्सेस किमान ६०% अथवा त्यापेक्षा अधिक गुण मिळाले असावेत).

२) सन २०२५–२६ सालाकारिता शैक्षणिक पारितोषिकांच्या रकमेत भरघोस वाढ करण्यात आली आहे.

३) पारितोषिकांची रक्कम पुढील प्रमाणे असेल

| | |
|---|---|
| अ) माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (१०वी) | रु. २५००/- |
| ब) उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (१२वी) डिप्लोमा १० वी नंतर | रु. ३०००/- |
| क) पदवी परीक्षा (सर्व शाखा) डिप्लोमा १२ वी नंतर | रु. ३५००/- |
| ड) पदव्युत्तर परीक्षा (सर्व शाखा) | रु. ४०००/- |
| इ) उच्च शिक्षित | रु. ४५००/- |

४ अर्जासोबत गुणपत्रिकेची व प्रमाणपत्राची, शैक्षणिक संस्थेच्या प्रमुखाने अथवा कार्यालय प्रमुखाने सही शिक्यानिशी (Attested) साक्षांकित केलेली छायांकित प्रत (Xerox Copy) जोडली पाहिजे.

५. पदविका अथवा पदवी (Diploma & Degree Courses) च्या प्रत्येक वर्षाच्या Final पर्यंतची Certificate जोडणे आवश्यक आहे.

६. उच्चशिक्षित सभासद पती/पत्नी/पाल्याचा पासपोर्ट साईज फोटो अर्जासोबत जोडणे बंधनकारक आहे

७. वरील सर्व अटी पूर्ण करणाऱ्या अर्जदारांनी त्यांचे अर्ज श्री. गजानन ए सांगळे मानद सचिव, मुंबई पोस्टल एम्प्लॉईज को–ऑप. क्रेडिट सोसायटी लि., मुंबई ४०० ००१. च्या नावे बंद लिफाफ्यातून अथवा प्रत्यक्ष शुक्रवार दि. ३१/०७/२०२६ पर्यंत दुपारी ३.०० वाजेपर्यंत) पोहोचतील अशा रितीने पाठवावेत, "लिफाफ्यावर शैक्षणिक पारित्तोषिकांसाठी अर्ज" असे स्पष्टपणे नमुद करावे, दिनांक ३१/०७/२०२६ पर्यंत आलेल्या अर्जांचाच विचार करण्यात येईल. त्यानंतर आलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

८. अर्जाचे छापील नमुने सोसायटी कार्यालयात उपलब्ध आहेत. सभासदाने अर्जाची मागणी पोस्टाद्वारे केल्यास ते पोस्टाद्वारे पाठविण्यात येतील, तसेच सोसायटीचा वेब साईट www.mumbaipostsociety.com वर देखील अर्ज उपलब्ध आहेत. सोसायटीच्या वेबसाईट वरून आपण हा अर्ज डाऊनलोड करून घेऊ शकता, धन्यवाद !

आपला

मुंबई
दिनांक : १९/०६/२०२६

श्री. गजानन ए सांगळे
मानद सचिव

# मुंबई पोस्टल एम्प्लॉईज को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि.
## Mumbai Postal Employees Co-operative Credit Society Ltd.
दूरध्वनी क्र. : २२६२०४१३, २२६९४१७२, ८०९७८६१५०१/८०९७८६३५०१
Whatsapp No.: 97699 28894 | Email: mumbaipostsociety@gmail.com
जी. पी. ओ. इमारत, तळ मजला, मुंबई ४०० ००१. / G. P. O. Building, Ground Floor, Mumbai - 400 001


सभासद बंधु भगिनीनो,

**आपणा सर्वांना "गणेशोत्सवाच्या हार्दिक शुभेच्छा"**

आपणांस कळविण्यास आनंद होत आहे की, दिनांक ०१ सप्टेंबर २०२६ रोजी पार पडलेल्या संचालक मंडळाच्या मासिक सभेत, मंजूर केलेल्या निर्णयानुसार खालील सर्व योजनांच्या रकमेमध्ये वाढ व बदल करण्यात आलेले आहेत. सदर वाढ आणि बदल दिनांक ०१ ऑक्टोबर २०२६ पासुन लागू करण्यात आलेले आहेत.

१) हमिनीधी कर्ज मयदित रु.२०,००,०००/- वरुन रु.२३,००,०००/- इतकी वाढ करण्यात आलेली आहे.

२) हमिनीधी कर्जावरील व्याज दरात द.सा.द.शे.९.६०% वरुन कमी करून ९.३०% असा करण्यात आला आहे.

३) कर्ज सुरक्षा योजना रक्कमेत प्रति एक लाख कर्जाकरिता रु. ५०/- वरुन कमी करून कर्ज सुरक्षा निधी रु.३०/- (जीएसटी सहित) इतका आकारण्यात येईल.

४) कन्यादान योजना रक्कमेत रु.५०००/- वरुन रु.७५००/- इतकी वाढ करण्यात आलेली आहे.

५) प्रतीमाह फक्त रु.४०/- आकारण्यात येत असलेल्या सभासद कल्याण निधी योजना अंतर्गत (प्रत्येकी रु.२५,०००/-) सभासदांच्या पती अथवा पत्नी सह सभासदांच्या आई वडिलांचा देखील समावेश करण्यात आला आहे.

६) सभासदाच्या मृत्यू पश्चात त्याच्या कुटुंबियांना देण्यात येणाऱ्या मरणोत्तर सहाय्य निधी योजना रक्कमेत रु.५०००/- वरुन रु.७,५००/-इतक्या रक्कमेची (विना परतावा) वाढ करण्यात आलेली आहे.

७) परस्पर सहाय्य निधी योजनाद्वारे सभासदांना सेवानिवृत्तीनंतर मिळणाऱ्या रक्कमेत रु.८०००/- ते रु.१५,०००/- इतक्या रक्कमेची वाढ करण्यात आलेली आहे.

८) १० वी ते पदवीत्तर शैक्षणिक पारितोषिक रक्कमेत भरघोस वाढ करण्यात आलेली आहे.

९) सभासदांना आपल्या कुटुंबियांसोबत निसर्गरम्य ठिकाणी पर्यटनाचा आनंद माफक दरात व आधुनिक सुविधायुक्त करता यावा, यासाठी अलिबाग येथे “कोस्टल बे इन” या रिसॉर्ट मध्ये २ रूम सभासदांसाठी आरक्षित करण्यात आलेल्या आहेत. कृपया सभासदांनी या योजनेचा लाभ घावा.

**सभासदांच्या माहितीसाठी आपल्या सोसायटीच्या सर्व योजनांची विस्तृत माहिती पत्रके वेबसाईटवर उपलब्ध आहेत.**

**अधिक माहितीसाठी सोसायटीच्या कार्यालयात सकाळी १० ते सायं.५ या वेळेत संपर्क साधावा.**

**धन्यवाद !**

**आपले सहकारी,**

| | | | |
|---|---|---|---|
| **सदानंद राणे** | **गुरुदत्त आळवे** | **गजानन सांगळे** | **संदिप मयेकर** |
| **अध्यक्ष** | **उपाध्यक्ष** | **मानद सचिव** | **मानद खजिनदार** |

BOMBAY, GENERAL POST OFFICE

# मुंबई पोस्टल एम्प्लॉईज को-ऑप. क्रेडिट सोसायटी लिमिटेड
# Mumbai Postal Employees Co-operative Credit Society Ltd.

दूरध्वनी क्र. : २२६२ ०४१३, २२६९ ४१७२, ८०९७८६३५०१, ८०९७८६१५०१

जी. पी. ओ. बिल्डींग, तळ मजला, मुंबई - ४०० ००१. / G. P. O. Building, Ground Floor, Mumbai - 400 001.


## अलिबाग विश्राम कक्ष

**सभासद बंधू आणि भगिनींनो,**

आपणांस कळविण्यास अत्यंत आनंद होत आहे कि, दिनांक ०१ सप्टेंबर २०२६ रोजी संपन्न झालेल्या सोसायटीच्या संचालक मंडळ सभेत मंजूर केलेल्या 'ठरावा' नुसार 'अलिबाग' येथे 'निसर्गरम्य' ठिकाणी आपल्या कुटुंबा समवेत प्रेक्षणीय स्थळ पाहण्यासाठी तसेच तेथे वास्तव्यासाठी सोसायटी मार्फत सर्व सभासदांसाठी कोस्टल बे इन, भीमेश्वर देऊळ बस स्टॉप समोर, लोंढे आळी, नागांव, अलिबाग ४०२२०४ या ठिकाणी अल्प दरात दोन रूम्स आरक्षित केलेल्या आहेत.

**सदर योजनेचा लाभ गुरुवार दि. ०१ ऑक्टोबर २० २६पासून सर्व सभासदांना घेता येणार आहे.**

१) सभासदांनी रूम्स आरक्षित करण्यासाठी सोसायटी कार्यालयात तसेच वेबसाईटवर आरक्षण अर्ज उपलब्ध असेल तो अर्ज संपूर्ण भरून बुकिंगसाठी सोसायटी कार्यालयात जमा करणे आवश्यक आहे. सोसायटी कार्यालयातूनच आपणांस आरक्षण पावती व आरक्षण पत्र दिले जाईल.

२) एक विश्राम कक्ष आरक्षित करण्यासाठी एका रूमचे एका दिवसाचे शुल्क रु.१५००/- (रु.एक हजार पाचशे फक्त) इतके आहे. एका रूम मध्ये फक्त चार जणांना ( २ वर्षापेक्षा जास्त वयांच्या मुलांसह ) राहण्याची परवानगी आहे.

३) अलिबाग येथील कोस्टल बे इन हॉटेलच्या व्यवस्थापकांना आपला फोटो असलेल्या ओळखपत्राची झेरोक्स प्रत आणि अलिबाग विश्राम कक्ष भाडे भरल्याची पावती सादर करावी. चेक इन वेळ दुपारी १२.०० व चेक आउट वेळ दुसऱ्या दिवशी सकाळी ११.०० वाजे पर्यंतच असेल. सभासदांनी हॉटेलच्या सर्व नियम व अटींचे पालन करणे अनिवार्य आहे.

**सदर हॉटेलच्या सुविधांची व नियमांची यादी,तसेच सदर विश्रामगृहाच्या आरक्षणाचा अर्ज सोसायटीच्या अधिकृत वेबसाईटवर उपलब्ध आहे. Website:www.mumbaipostsociety.com**

**अधिक माहितीसाठी सोसायटी कार्यालयात संपर्क साधावा.**

---

## आपले सहकारी,

| | | | |
|---|---|---|---|
| श्री.सदानंद राणे | श्री.गुरुदत्त आळवे | श्री.गजानन सांगळे | श्री.संदीप मयेकर |
| अध्यक्ष | उपाध्यक्ष | मानद सचिव | मानद खजिनदार |

# मुंबई पोस्टल एम्प्लॉईज को-ऑप क्रेडिट सो.लि.मुंबई

कृपया सदर पत्रक सभासदांच्या माहिती करिता कार्यालयाच्या सुचना फलकावर लावावे.

सभासद बंधु भगिनीनो,

आपणांस कळविण्यास आनंद होत आहे की, दिनांक ०१ सप्टेंबर २०२६ रोजी पार पडलेल्या संचालक मंडळाच्या मासिक सभेत, मंजूर केलेल्या निर्णयानुसार हमिनिधी व तातडीच्या कर्जासाठी खालील प्रमाणे बदल करण्यात आले आहेत.सदर बदल आणि वाढ दिनांक ०१ ऑक्टोबर २०२६ पासून लागू करण्यात आलेले आहेत.

**सभासद हमिनिधी कर्ज मर्यादा :**

१) सभासद झाल्यापासून ६ महिने नियमित वर्गणी जमा केल्यानंतर रु.५,००,०००/-
२) सभासद झाल्यापासून १ वर्ष नियमित वर्गणी जमा केल्यानंतर रु.१०,००,०००/-
३) सभासद झाल्यापासून २ वर्ष नियमित वर्गणी जमा केल्यानंतर रु.१२,००,०००/-
४) सभासद झाल्यापासून ३ वर्ष नियमित वर्गणी जमा केल्यानंतर रु.१४,००,०००/-
५) सभासद झाल्यापासून ४ वर्ष नियमित वर्गणी जमा केल्यानंतर रु.१६,००,०००/-
६) सभासद झाल्यापासून ५ वर्ष नियमित वर्गणी जमा केल्यानंतर रु.१८,००,०००/-
७) सभासद झाल्यापासून ६ वर्ष नियमित वर्गणी जमा केल्यानंतर रु.२०,००,०००/-
८) सभासद झाल्यापासून ७ वर्ष नियमित वर्गणी जमा केल्यानंतर रु.२३,००,०००/-

**तातडीची कर्ज मर्यादा :**

| | |
|---|---|
| १) रु.५०,०००/- पर्यंत वेतन मर्यादे पर्यंत | रु.५०,०००/- वैयक्तिक कर्ज मर्यादा |
| २) रु.५०,०००/- ते १ लाख वेतन मर्यादे पर्यंत | रु.७५,०००/- वैयक्तिक कर्ज मर्यादा |
| १) रु.१ लाखावरील वेतन मर्यादे पर्यंत | रु.१,००,०००/- वैयक्तिक कर्ज मर्यादा |

हमिनिधी कर्जावरील व्याजदर द.सा.द.शे.९.६०% वरून ९.३०% इतके व्याजदर द.सा.द.शे. करण्यात आले आहे.

कर्ज सुरक्षा योजना रक्कम हमिनिधी कर्ज एक लाख रुपयांसाठी रु.५०/- वरून रु.३०/- (GST- सहित) कमी करण्यात आली आहे.

संस्थेचे सभासदत्व स्विकारल्यानंतर ६ महिने पूर्ण होईपर्यंत हमिनिधी कर्ज मिळणार नाही याची कृपया नोंद घ्यावी व सहकार्य करावे.

सभासदाने घेतलेल्या हमिनिधी कर्जाच्या १० परतफेड हफ्त्यांची नियमितपणे केल्यानंतरच पुन:श्च हमिनिधी कर्जास पात्र होईल.

हमिनिधी कर्ज,त्रिफ्ट (बचत) फंड कर्ज,तात्काळ कर्ज या सर्व कर्जांच्या परतफेड हफ्ता वजा जाता सभासदाला रु.१०,०००/- इतके प्रति महिना वेतन हाती येणे गरजेचे आहे. तरच कर्ज मंजूर केले जाईल.

सभासदांनी इतर संस्थेची कर्ज घेतली असल्यास त्याची सविस्तर माहिती देणे बंधनकारक असेल. तसेच "माहिती जाणीवपूर्वक लपविल्यास सभासदाने उपरोक्त सोसायटीकडून घेतलेले कर्ज एक रकमी वसूल करण्याचे अधिकार" पत्र सोसायटीला अर्जासोबत देणे बंधनकारक आहे. त्यानंतरच कर्ज मंजूर केले जाईल.

आपले सहकारी,

| | | | |
|---|---|---|---|
| सदानंद राणे | गुरुदत्त आळवे | गजानन सांगळे | संदिप मयेकर |
| अध्यक्ष | उपाध्यक्ष | मानद सचिव | मानद खजिनदार |